# कारंजा लाड येथे जनसुरक्षा शिबिराचे आयोजन ; नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

«वाशिम|प्रतिनिधी »







स्टेट बँक ऑफ इंडिया व जिल्हा अग्रणी बँक, वाशिम यांच्या संयुक्त विद्यमाने कारंजा लाड येथे जनसुरक्षा शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचे अध्यक्षपद प्रादेशिक संचालक, रिझर्व बँक ऑफ इंडिया, नागपूर सचिन वाय. शेंडे यांनी भूषविले.

या प्रसंगी उपमहाप्रबंधक, रिझर्व बँक ऑफ इंडिया नागपूर अंजना श्यामनाथ, उपमहाप्रबंधक, स्टेट बँक ऑफ इंडिया अमरावती शशी रंजन, क्षेत्रीय व्यवस्थापक, स्टेट बँक ऑफ इंडिया अकोला आशिष कुमार सिंह, उपमहाप्रबंधक, स्टेट बँक ऑफ इंडिया किसले कुमार तसेच जिल्हा व्यवस्थापक, रिझर्व बँक ऑफ इंडिया नागपूर हर्षल चितळीकर यांची प्रमुख उपस्थिती होती. कारंजा लाड येथील सर्व बँक शाखा प्रमुखांनीही शिबिरात सहभाग घेतला. विविध ग्रामपंचायतींमधून दोनशेहून अधिक नागरिकांनी हजेरी लावून कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. आपल्या अध्यक्षीय भाषणात प्रादेशिक संचालक सचिन वाय. शेंडे यांनी नागरिकांना बँक खात्याची KYC पूर्ण करून प्रधान मंत्री सुरक्षा विमा व जीवन ज्योती विमा योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन केले.

उपमहाप्रबंधक अंजना श्यामनाथ यांनी RBI Ombudsman बाबत मार्गदर्शन केले.

उपमहाप्रबंधक शशी रंजन यांनी अटल पेन्शन योजनेचे महत्व स्पष्ट करत सर्व युवकांना त्याचा लाभ घ्यावा असे सांगितले.जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक यशवीर कुमार यांनी विविध योजनांबाबत माहिती दिली. विशेष म्हणजे अटल पेन्शन योजनेअंतर्गत वाशिम जिल्ह्याने राज्यात प्रथम स्थान मिळविल्याची गौरवाची नोंद त्यांनी या वेळी केली.

कार्यक्रमाचा समारोप क्षेत्रीय व्यवस्थापक आशिष कुमार सिंह यांनी सर्वांचे आभार मानून केला.

या प्रसंगी नागरिकांना आवाहन करण्यात आले की, त्यांनी आपल्या ग्रामपंचायत शिबिरामध्ये अथवा जवळच्या बँक शाखेमध्ये जाऊन खात्याची खम्ण करून घ्यावी आणि सर्व शासकीय योजनांचा लाभ घ्यावा. अशी माहिती जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक यशवीर कुमार यांनी दिली.

दैनिक
सायरन